दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.५ जानेवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १३२ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 5 January 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 132 | Pages 4 | Rate 4 Rs

उमेदवाराचा फोन स्विच ऑफ

मुंबई–अविनाश जाधव म्हणाले, उमेदवारी अर्ज पाठीमागे घेण्याचा दिवसाचा तो व्हिडिओ आहे. आम्हाला हा व्हिडिओ तिथे उपस्थित असलेल्या पत्रकारांच्या माध्यमातून आलेले आहे, आम्ही तिथे थोडी कॅमेरे लावले होते. अद्याप तो उमेदवार आम्हाला भेटलाच नाहीये, तो फोन स्विच ऑफ करून गायब आहे. जर त्याला एक पोलिसवाला घेऊन जात असेल तर त्याला धमकवलाच असेल ना? त्याला आतमध्ये घेऊन जाणारा माणूस हा पोलिस ऑफिसर आहे. तो कुठल्या जदतगे स्टेशनला आहे कुठल्या क्राईम ब्रँचला आहे तो तुम्ही शोधा. ज्यांनी ज्यांनी शिवसेना मनसे पक्षाची गद्दारी केली आहे त्यांचा पाहुणचार होणार असल्याचा इशारा जाधव यांनी दिला आहे.

देवा देता है तो छप्पर फाडके देता है!

छगन भुजबळांकडून मुख्यमंत्र्यांचे कौतुक

नायगावचे नाव क्रांतीज्योती सावित्रीनगर करण्याची मागणी

देवा देता तो छप्पर फाडके देता है

छगन पुढे भुजबळ म्हणाले, हा किस्सा सांगण्याचा उद्देश एवढाच की, त्यावेळी २५-३० लाख रुपयाला सुद्धा आम्हाला अडचण येत होती. पण आता दीडशे कोटी रुपयांच्या कामाचे भूमिपूजन झाले. देवा देता तो छप्पर फाडके देता है. त्यामुळे सगळ्यांच्या वतीने शाहू-फुले-आंबेडकरांच्या अनुयायांच्या वतीने मी मुख्यमंत्री आणि मंत्र्यांचे आभार मानतो, असे म्हणत छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले.

महात्मा फुलेंची २०० वी जयंती

पुण्यातील फुलेवाड्याचे काम रेंगाळलेले आहे. त्याला गती द्यायला पाहिजे. दुसरी गोष्ट ११ एप्रिल २०२७ रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांची २०० वी जयंती आहे. महात्मा ज्योतिराव फुलेंची २०० जयंती आम्ही देशभरात साजरी करणार असल्याचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले आहे. पंतप्रधानांनी जाहीर केले म्हटल्यावर राज्य सरकारही त्याबाबत हालचाल करेल, अशी आशा छगन भुजबळ यांनी व्यक्त केली.नायगावच्या नामांतराची मागणीनायगावचे नाव क्रांतीज्योती सावित्रीनगर ठेवा, अशा मागणीचे कुणीतरी पत्र मला आणून दिले. आमच्या सगळ्यांचीच विनंती आहे की, त्याबाबत कार्यवाही करावी. बाकीचे मंत्री त्याला पाठिंबा देतील, याची मला खात्री आहे, असेही छगन भुजबळ म्हणाले.

सातारा । प्रतिनिधी

सावित्रीबाईंच्या स्मारकासाठी १५० कोटी रुपयांच्या कामाचे भूमिपूजन झाले आहे. मात्र, एक काळ असा होता की याच नायगावमध्ये सावित्रीबाईंचे घर उभारण्यासाठी आम्हाला २५-३० लाख रुपयांसाठीही सरकारी नियमांचा आणि परवानगीचा मोठा संघर्ष करावा लागला होता. पण आता देवा देता है तो छप्पर फाडके देता है, असे म्हणत छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री फडणवीसांचे कौतुक केले. यावेळी त्यांनी नायगावचे नाव बदलून 'क्रांतीज्योती सावित्रीनगर' करावे, अशी आग्रही मागणीही राज्य सरकारकडे केली.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त नायगाव येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत स्मारकाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. प्रकृती ठीक नसल्याने छगन भुजबळ मागील काही महिन्यांपासून सार्वजनिक कार्यक्रमापासून दूर आहेत. दोन महिन्यांपूर्वीच त्यांच्या हृदयाची शस्त्रक्रिया झाली. सध्या डॉक्टरांनी त्यांना विश्रांती घेण्यास सांगितले आहे. मात्र, आज डॉक्टरांची परवानगी घेऊन भुजबळ या सोहळ्यासाठी उपस्थित राहिले.

छगन भुजबळ यांनी १९९३ मधील आठवण सांगताना म्हटले की, सावित्रीबाई फुले यांची आज १९५ वी जयंती आहे. आज आपण एवढा मोठा कार्यक्रम केला. येथे मोठे स्मारक उभे होत आहे. पण २५-३० वर्षांपूर्वी १९९३ मध्ये राष्ट्रपतींनी फुले वाड्याचे लोकार्पण केल्यानंतर हरिभाऊ नरके माझ्याकडे आले. नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांचा जन्म झाला. तिथे आपण काहीतरी केले पाहिजे. मी त्यांना सांगितले की, कुठे काय आहे ते जाऊन बघा. ते तिथे गेले आणि घर बघितले. नंतर मी आलो. सगळ्या लोकांना येथे सावित्रीबाईंचा जन्म झाल्याचे सांगितले.आता इतर घरांप्रमाणे ते घर देखील निर्माण झाले पाहिजे. त्यानुसार कामाला लागतो. पैशांचा प्रश्न आला. त्यावेळेला मी उपमुख्यमंत्री होतो. पण एमएलसी होते. तेव्हा वर्षाला ४० ते ५० लाख रुपये मिळत असतील. त्यातलेही काही खर्च झाले होते. याशिवाय ते पैसे खर्च करण्यासाठी नियम फार होते.चंद्रअय्यंगार नावाचा अर्थसचिव होता. तो म्हणाला आपण हे करायचे, मी तुम्हाला परवानग्या मिळवून देतो. त्यानंतर कामाला सुरुवात झाली आणि सावित्रीबाईंचे घर उभे राहिले. शरद पवार आणि तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सावित्रीबाईंच्या नवीन बांधलेल्या घराचे उद्घाटन केले, असा किस्सा छगन भुजबळ यांनी सांगितला.

केज तहसील व पोलिस प्रशासनाच्या नाकावर टिचून अतिक्रमण

तहसील समोरच उभारले अनधिकृत बांधकाम आंदोलकांसाठी राखीव जागाही गिळंकृत

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

केज शहरातील प्रशासकीय दारातच अतिक्रमणाचे बिनधास्त साम्राज्य उभे ठाकल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. तहसील कार्यालयासमोर, आणि अगदी केज पोलिस ठाणे व तहसील कार्यालय यांच्या मधोमधच पत्र्याचे शेड उभे करून अतिक्रमण सुरू असल्याची जोरदार चर्चा शहरात आहे. विशेष म्हणजे, हे सर्व कथितरीत्या रात्रीच्या अंधारात पत्र्याचे डबे ठोकून सुरू

असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.सर्वसामान्य नागरिकांना आंदोलन करण्यासाठी राखून ठेवलेली जागासुद्धा अतिक्रमणाच्या विळख्यात सापडली आहे. आंदोलकांसाठी असलेली ही जागा व्यापली गेल्याने लोकशाही मार्गाने आपला आवाज उठविण्याची जागाच हिरावली गेल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.तहसीलसमोर आणि पोलिस ठाण्याच्या कुशीतच सुरू असलेले हे अतिक्रमण प्रशासनाच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. प्रशासकीय यंत्रणा डोळ्यासमोर घडणाऱ्या या प्रकाराकडे डोळेझाक का करतेय, असा सवालही नागरिक विचारत आहेत.दरम्यान, संबंधित अतिक्रमणाविरोधात तत्काळ कारवाई करून सार्वजनिक जागा मोकळी करून द्यावी, जबाबदारांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सातपुड्यात धुक्याची दाट चादर; मोलगी परिसरात जनजीवन विस्कळीत

दैनिक वादळ वार्ता

मोगली । रवींद्र वळवी

मोलगी (ता. शहादा) व सातपुड्याच्या रांगांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून दाट धुक्याने चादर पांघरण्याचे दृश्य पाहायला मिळत आहे. शनिवार, ३ जानेवारी रोजी पहाटेपासूनच परिसरात दाट धुके पसरल्याने हाताच्या अंतरावरील वस्तूही स्पष्ट दिसत नव्हत्या. यामुळे रस्त्यांवरील वाहतूक मंदावली असून नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले. दुपारपर्यंत धुक्यामुळे बाजारपेठा ओस पडल्या तर शेतीची कामेही ठप्प झाली.

दृश्यमानता कमी झाल्याने अपघातांची शक्यता वाढली असून वाहनधारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. धुक्याबरोबरच वाढलेली थंडी आणि आर्द्रता यामुळे सर्दी, खोकला, दमा व सांधेदुखीचे त्रास वाढण्याची शक्यता आरोग्य

तज्ज्ञांनी वर्तवली आहे. पिकांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. परिसरात 'न धड थंडी, न धड ऊन' असे विचित्र हवामान कायम असून नागरिकांनी उबदार कपडे वापरणे, अनावश्यक प्रवास टाळणे आणि आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

वादळी कट्टा

राजकारणाची गंमत-जंमत

राजकारणात रंग भारी, सगळेच झाले महारथी,
निवडणुकीत हात जोडती, मग पाच वर्षे करती मौनव्रती!

मत मागताना म्हणती - जनतेचा आम्ही श्वास,
जिंकल्यावर मात्र दिसत नाही, शोधत बसतेच जनता खास!

विकासाचा विषय आला, करतात मोठ्ठी भाषणे,
रस्ते, पाणी, रोजगार बाकी सगळे स्वप्नच राहणे!

एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, करतात रोज तमाशा,
जनतेच्या डोळ्यांपुढे मात्र, बदलत नाही काहीच आशा!

खिसा भरला की सगळे ठरती, लोकशाहीचे भगत,
जनतेला मात्र देतात आश्वासनांचेच फक्त नगद!

:: कवी ::
विलास पोवळे

धक्कादायक: शहाद्यात शिक्षकाकडून अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग; 'प्रवक्ता अकॅडमी'तील प्रकाराप्रकरणी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता

नंदुरबार । दिपक गोसावी

विद्यार्थ्यांना सुरक्षित वाटावे अशा शैक्षणिक संस्थेतच एका नराधम शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना शहादा शहरात घडली आहे. येथील 'प्रवक्ता अकॅडमी' मधील शिक्षक योगेश अरुण शेंडे याने हे कृत्य केले असून, त्याच्यावर शहादा पोलीस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी शिक्षक योगेश शेंडे याने पीडित मुलीला स्पेलिंग पाठांतर करून घ्यायचे आहे असे सांगून विश्वासात घेतले. अभ्यासाच्या बहाण्याने त्याने मुलीला अकॅडमीच्या ऑफिसमध्ये बोलावले. तिथे कोणीही नसल्याचा फायदा घेत त्याने विद्यार्थिनीचा विनयभंग केला आणि तिला अश्लील कृत्य करण्यास भाग पाडले. संबंधित विद्यार्थिनीने या कृत्याला कडाडून विरोध केला आणि तिथून पळ काढल्याने तिची सुटका झाली. त्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. पीडित मुलीच्या तक्रारीवरून शहादा पोलिसांनी तातडीने पावले उचलली आहेत. आरोपी शिक्षक योगेश शेंडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४ आणि ७५(१), ७५(२).७६,७८ पोक्सो कायदा कलम ८, १२ (अल्पवयीन मुलांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण).तसेच अनुसूचित जाती,जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार स्वतः या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. आरोपीला लवकरात लवकर कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पालक संवाद मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद डॉ.राजेश इंगोले यांचे प्रभावी मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महात्मा फुले स्मारक समिती आणि ढगे कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पालक संवाद मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यात सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ आणि माजी शिक्षण सभापती डॉ. राजेश इंगोले यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून पालकत्वाचे विविध पैलू खुमासदार शैलीत उलगडून दाखवले.

डॉ. इंगोले यांनी सकारात्मक पालकत्वाचे महत्त्व स्पष्ट करताना मुलांना योग्य संस्कार, वेळ, संवाद आणि प्रोत्साहन देणे ही पालकांची मूलभूत जबाबदारी असल्याचे सांगितले. मुलांची तुलना न करता त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना द्यावी, मोबाईल आणि टीव्हीच्या व्यसनापासून त्यांना दूर ठेवत योग्य दिशादर्शन करावे, असेही त्यांनी या वेळी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अनिल नरसिंगे तर प्रा. डॉ. किरण चक्रे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मिलिंद ढगे यांनी केले तर आभार प्रदर्शन आदित्य कदम यांनी केले. शेवटी पालकांनी उत्साहाने प्रश्न विचारत संवाद साधला आणि स्पर्धेत उजवी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला.

संपादकीय

आणखी एक बस अपघात

गेल्या आठवड्यातच बेस्ट उपक्रमात खासगीकरण का नको यावर प्रकाश टाकत असतानाच दुर्दैवाने भांडुप बेस्टचा अपघात घडला. कुर्ला येथे झालेल्या अपघाताची आठवण झाली. योगायोगाने वर्ष संपता संपता झालेला हा अपघात आणि गेल्या वर्षी याच कालावधीत झालेला कुर्ल्यातील तो अपघात दोन्हीही बस एकाच कंपनीच्या, म्हणून यावर आता पुन्हा ऊहापोह करणे आवश्यक आहे.वर्ष संपता संपता भांडुप येथे झालेला अपघात हा दुर्दैवीच. गेल्यावर्षी कुर्ला येथे झालेला अपघातही वर्ष संपता संपता झाला. दोघांमध्ये ओलेक्ट्रा या खाजगी बस गाडीचा अपघात सारखा नसला तरी गेल्या सोमवारची बस मिडी होती तर कुर्ला येथे झालेल्या अपघातातली बस ही बारा मीटर मोठी होती. भांडुप येथे पादचाऱ्यांना बसने चिरडले व कुर्ला येथील बस अपघातातही पादचाऱ्यांनाच बसने चिरडले. दोन्ही अपघातांतील अहवालामध्ये बस चालकालाच जबाबदार ठरवले गेले आणि पुन्हा सर्वजण मोकळे झाले. वास्तविक या बसगाड्यांच्या त्रुटीकडे आजतागायत कोणालाही लक्ष द्यायला वेळ नाही. सर्वचजण निवडणुकीच्या धामधुमीत व्यस्त आहेत. मृतांच्या नातेवाइकांना आर्थिक मदत करून सर्वजण मोकळे झाले, मात्र बसबाबत निर्माण झालेले प्रश्न हे जशेच्या तसे राहिलेत. या अपघाताबद्दल बरेच प्रश्न निर्माण झाले. वास्तविक बस खासगी कंत्राटदाराची होती. मग यावर बेस्टचा चालक कसा? जेव्हा या कंपनीबरोबर करार झाला तेव्हा त्यांनी चालक दल पुरवणे आवश्यक होते. मात्र कंत्राटदारांकडील बस चालक टिकत नाहीत आणि मग नाईलाजाने बेस्टचे चालक वापरावे लागतात. थोडेफार चालक प्रशिक्षण देऊन त्यांना विद्युत बस गाड्यांवर पाठवण्यात येते. मागील वर्षी कुर्ला येथील जो अपघात घडला त्यातील बस चालकाला काही थोड्या दिवसांचे जुजबी प्रशिक्षण देऊन या विद्युत बसगाडीवर पाठवण्यात आले होते. बस गाडीचा अहवाल काय आला हे सारे गुलदस्त्यातच राहिले. मात्र त्या कंपनीला वाचवण्यासाठी अखेर संपूर्ण यंत्रणेलाच बस चालकाचा बळी द्यावा लागला. दहा ते वीस हजार करोड असलेली ही कंत्राटे टिकवण्यासाठी कोणाचा तरी बळी द्यावाच लागणार.

भांडुप बस अपघातातील बस चालकावर सध्या यंत्रणेनेच घाव घातला आहे. यंत्रणा कशा पद्धतीने काम करते आहे याचे हे उत्तम उदाहरण. वास्तविक पाहता ही बस गेले काही दिवस दुरुस्ती कामामुळे उभी होती. जेव्हा ती रस्त्यावर आली तेव्हा त्याबाबत वारंवार तक्रारी केल्या गेल्या होत्या. तरी मात्र त्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि अखेर अपघात हा घडलाच. सुरक्षित आरामदायी प्रवास म्हणून या बसेना प्रवासी प्राधान्य देतात. आशिया खंडातील सर्वात दर्जेदार सेवा देणारी म्हणून बेस्ट उपक्रमाची जगभरात ओळख आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून तोट्याच्या नावाने बेस्ट उपक्रमात कंत्राटी पद्धतीने बेस्ट उपक्रमाला पूर्णपणे वेढले आहे. कंत्राटी पद्धतीवर बसेनंतर कंत्राटी चालक व वाहक यामुळे बेस्ट उपक्रमाची खासगीकरणाकडे वाटचाल सुरु आहे. मात्र हे खासगीकरण नसल्याचे बेस्ट उपक्रमाने स्पष्ट केले असले तरी प्रत्यक्षात कंत्राटी पद्धतीवर बेस्ट उपक्रमाचा अंकुश नाही, हे वारंवार सिद्ध होत आहे. आज संपूर्ण कारभार कंत्राटी पद्धतीवर अवलंबून आहे. कंत्राटी पद्धत बेस्ट उपक्रमासाठी तापदायक ठरु लागली असून बेस्टचे कायमस्वरूपी कर्मचारी यात नाहक बदनाम होत आहेत. मुळात खासगीकरणामागे बेस्ट इतकी वाहवत गेली, की त्याच्या मूळ उद्दिष्टापासूनच भरकटत चालली आहे. काही महिन्यांपूर्वी बेस्टकडे ५०० हून जास्त मिडी बस गाड्या होत्या. मात्र त्या कालांतराने भंगारात गेल्या. मुंबईच्या उपनगरातील काही पूर्व व पश्चिम उपनगरातील काही ठिकाणी अशी आहेत, की तिथे छोटे व अरुंद गल्लीबोळातील रस्ते आहे. तेथे बेस्ट सेवा सुरू होत्या. मात्र कालांतराने त्यात घट होऊ लागली. जेथे बस सेवा सुरू होत्या, तिथे चालवण्यासाठी बेस्टकडे त्या प्रकारच्या बस गाड्या नाही, म्हणून खासगी कंत्राटदारांकडे बस गाड्या चालवण्याचा प्रयत्न केल्यास मात्र तोही निष्फळ ठरला आणि अखेर बऱ्याच ठिकाणी या बस सेवा बंद कराव्या लागल्या.कांजूर, भांडुपमधील जेथे अपघात झाला तेथे नरदास नगर, टेंभीपाडा, प्रताप नगर तसेच डोंगराळ भागात छोट्या गल्ल्या असल्याने तेथे मिडी प्रकारच्या बस गाड्या बेस्टने काही काळापूर्वी बनवून घेतल्या होत्या. मात्र नंतर बेस्टने बस खरेदी करणे बंद केले. जास्त बोंबाबोंब झाल्याने लोकप्रतिनिधींनी बेस्टवर दबाव टाकण्यास सुरुवात केली व काळा किल्ला आगारातून मिनी बस गाड्या या विक्रोळी आगारात आणून भांडुप, कांजूरमार्ग परिसरात चालवण्यात येऊ लागल्या. बऱ्याच बस चालकांनी तेथे बस चालवण्यास नकार दिला. काही ठरावीक बस गाड्या धावत होत्या. मात्र या अत्याधुनिक खासगी बस गाड्या या पटकन वेग घेतात. त्यामुळे उतारावरही या बस गाड्यांवर ताबा राहत नाही. अशा बऱ्याच तक्रारी होत्या. तरी बेस्टने त्या चालू ठेवल्या आणि भांडुप येथे ही दुर्दैवी घटना घडली. अशा बऱ्याच तांत्रिक व इतर समस्या या लोकप्रतिनिधी तसेच कामगार संघटना यांनी बेस्ट उपक्रमाच्या निदर्शनास यापूर्वी आणून दिल्या होत्या. मात्र या सर्व तक्रारांकडे बेस्ट उपक्रमाने दुर्लक्ष केले आणि त्याची परिणिती अपघातात झाली. कुर्ला व भांडुप येथे झालेला अपघात अरुंद रस्त्यांमुळे झाला. पदपथावर असलेल्या अतिक्रमणांमुळे झाला. भांडुप व कुर्ल्याचा अपघातही अशाच कारणांमुळे झाला. आता यावर उपाय म्हणून बेस्ट व्यवस्थापक यांनी सर्व बेस्ट चालकांना विद्युत बस गाड्यांचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य केले आहे. बेस्ट बस चालकांच्या प्रशिक्षणाचा प्रश्न त्यामुळे कंत्राटदाराचा आहे त्यासाठी बेस्टच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांनी विद्युत बस गाडीचे प्रशिक्षण का घ्यावे? बेस्टकडे स्वमालकीच्या फक्त सहा विद्युत बस गाड्या आहेत व आगामी काळात स्वमालकीच्या बस गाड्या घेणे बेस्टला परवडण्यासारखे नाही. मग कंत्राटदारांच्या बस गाड्यांवर प्रशिक्षण घेऊन पुन्हा अपघात घडल्यास बेस्ट बस चालकाला पुन्हा जबाबदार ठरवणार? अशा व्यवस्थेचा बळी बेस्टच्या कर्मचाऱ्यांना ठरवले जाणार का? का आता तरी यात सुधारणा होणार, याचे उत्तर येणारा काळ देईल? हे पाहणे औत्सुक्याचे असेल.

शिर्डीच्या लेंडी बागेत 'रातराणी'चा सुगंध १३ फेब्रुवारीला ऐतिहासिक शिर्डी परिक्रमा

दैनिक वादळ वार्ता
शिर्डी । प्रतिनिधी

साईबाबांच्या पवित्र लेंडी बागेला नव्या सुगंधाची जोड मिळाली आहे. 'ग्रीन अँड क्लीन शिर्डी फाउंडेशन'च्या पहलातून लेंडी बागेत रातराणीच्या ५० रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले असून आगामी १३ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या ऐतिहासिक शिर्डी परिक्रमेस प्रारंभिक घोषणा याच कार्यक्रमात करण्यात आली.

या उपक्रमास साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, ज्येष्ठ नगरसेवक अभय शेळके, एम्प्लॉईज सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून शिर्डीला हरित व स्वच्छ ठेवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना मनीलाल पटेल यांनी, रातराणीचा सुगंध लेंडी बागेतून चावडी व द्वारकामाईपर्यंत पोहोचला, तर ग्रीन अँड क्लीन शिर्डीचे स्वप्न साकार होईल, असे सांगितले. नगरसेवक अभय शेळके यांनी परिक्रमेसाठी शिर्डी सज्ज असल्याचे नमूद करत भाविकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

विठ्ठल पवार यांनी या वृक्षारोपणामुळे भाविकांना सकारात्मक ऊर्जा लाभेल, असा विश्वास व्यक्त केला, तर अध्यक्ष अजित पारख यांनी 'शिर्डी महापरिक्रमा महोत्सव २०२६' ची अधिकृत घोषणा केली. या उपक्रमामुळे शिर्डी परिसर अधिक हरित, स्वच्छ आणि सुवासिक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

लोहा तालुक्यातील सावरगाव येथे 'बालिका दिन' उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
लोहा । राजकुमार पिल्लोळे

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावरगाव येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात 'बालिका दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. हा कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक दगडगावे सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विनायक कोपनर सर उपस्थित होते.

या प्रसंगी शाळेतील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रभावी भाषणे सादर केली. काही विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या वेशभूषेत त्यांचे विचार मांडून उपस्थितांची मने जिंकली. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व व आजच्या युगातील महिलांची प्रगती यावर शिक्षकांनी मार्गदर्शन केले.बालिका दिनाचे औचित्य साधून वक्तृत्व स्पर्धा तसेच नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक दगडगावे सर म्हणाले, आजच्या काळात मुली प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. त्यांना योग्य संधी व प्रोत्साहन दिल्यास त्या देशाचे नाव उज्ज्वल करतील.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन कपिल गोपचुडे यांनी मानले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये आज स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे कार्यक्रमाच्या अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पूजन करुन अभिवादन करण्यात आले. व श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील चिमुकल्यांनी सावीत्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर उत्स्फूर्त भाषणे केली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर देशमुख, सतिष भिसे, रविकुमार गायकवाड मा. ग्रामपंचायत सदस्य, सिमा फुटाणे प्रिन्सीपल श्री संस्कार इंग्लिश स्कूल, अश्विनी राऊत हे होते.यावेळी सर्व शिक्षीका, प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाच्या अध्यक्ष यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या प्रिन्सीपल सौ सिमा फुटाणे, शिक्षीका सोनाली खंदारे मॅडम, सौ कोमल कापरे मॅडम, सौ .आरती आचार्य मॅडम, सौ. रेश्मा गायकवाड मॅडम, सौ. प्रियंका शिंदे मॅडम, सौ. वैष्णवी काळे मॅडम, प्रिती गाते मॅडम, सेविका सपाटे, संस्थेचे पदाधिकारी अमोल गलांडे, चालक अमजत पठाण, शाम घोडके, अशोक लोखंडे, आदित्य गलांडे, ज्ञानेश्वर पोपळघट, संचित गलांडे, संस्कार गलांडे यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रिन्सीपल सिमा फुटाणे मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन सौ आरती आचार्य मॅडम यांनी केले तर आभार वैष्णवी काळे मॅडम यांनी केले.

सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त बीडमध्ये भव्य अभिवादन रॅली

पथनाट्य,गीत आणि अभिवादन सभेतून सावित्रीमाईंच्या विचारांचा जागर

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीमाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड यांच्या वतीने शनिवारी शहरात आयोजित करण्यात आलेली भव्य अभिवादन रॅली व अभिवादन सभा मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.सकाळी ८ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर अभिवादन रॅलीस सुरुवात झाली. ही रॅली माळीवेस मार्गे सावित्रीमाई फुले चौक, क्रांतीबा ज्योतिबा फुले-राजमाता अहिल्या माता होळकर चौक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक असा मार्गक्रमण करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे सांगता झाली.

रॅलीदरम्यान मार्गावरील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या रॅलीत महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. जय ज्योती, जय क्रांती या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.रॅलीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे अभिवादन सभा घेण्यात आली. यावेळी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे, ओबीसी परिषद महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष मा.संदीपजी उपरे, राष्ट्रीय कन्या कनिष्ठ महाविद्यालयाचे मा.प्रा.राम गायकवाड, अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.उत्तम पवार तसेच यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.गणेश वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.अभिवादन सभेत मान्यवरांनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर मार्गदर्शनपर विचार मांडले तसेच स्त्री शिक्षण, समानता व सामाजिक न्यायाचा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेले पथनाट्य तसेच सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित गीत हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.सभेच्या समारोपानंतर तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला. या सभेचे प्रास्ताविक प्रा.राम गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.अंकुश कोरडे यांनी केले, तर आभार डॉ.विकास वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमात विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शालेय शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

गुरुकुल प्रीमियर लीगचा जल्लोषात शुभारंभ

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना 'क्रिकेट'ची नवी उंची

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय उराशी बाळगून गेल्या १८ वर्षांपासून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण संशोधन परिषदेच्या वतीने आयोजित 'गुरुकुल प्रीमियर लीग' क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात व क्रीडामय वातावरणात पार पडला.राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित या भव्य युवा महोत्सवात शिक्षण, संस्कार आणि खेळ यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.या युवा महोत्सवांतर्गत सामान्य ज्ञान, श्रुतलेखन, शब्दलेखन, सूर्यनमस्कार, लांब उडी, धावण्याच्या स्पर्धांसह पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी गट व मुलींसाठी स्वतंत्र अशा 'गुरुकुल प्रीमियर लीग' क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

माध्यमिक गटातील १८ संघ, प्राथमिक गटातील १५ संघ आणि मुलींचे ५ संघ अशा एकूण मोठ्या सहभागामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाची लाट उसळली आहे.या भव्य क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन दैनिक दिव्य लोकप्रभाचे उपसंपादक नितीनजी क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. दत्ता नलावडे अध्यक्षस्थानी होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अत्यंत सन्मानपूर्वक करण्यात आले. रेणुकाई प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक नाळपे सर, सचिव रोहिदास रोहीटे, माध्यमिक विभाग क्रिकेट प्रमुख विजयकुमार गिरे, प्राथमिक विभाग क्रिकेट प्रमुख बाबासाहेब पवार, सहसचिव संतोष देशमुख यांच्यासह सर्व पदाधिकारी, संचालक व शिक्षकवृंद उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव रोहिदास रोहीटे यांनी करताना गुरुकुल परिषदेच्या १८ वर्षांच्या सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याचा थोडक्यात आढावा मांडला. प्रस्ताविकात विजयकुमार गिरे यांनी क्रिकेट स्पर्धेमागील संकल्पना स्पष्ट करताना विद्यार्थ्यांमधील खेळाडूवृत्ती, शिस्त आणि संघभावना वृद्धिंगत करण्याचा उद्देश मांडला. उद्घाटनप्रसंगी टाळ्यांच्या गजरात मान्यवरांच्या हस्ते सामन्याचा टॉस करण्यात आला. यशोदीप गुरुकुल व कल्पवृक्ष गुरुकुल या माध्यमिक गटातील संघांमधील पहिल्या सामन्याने 'गुरुकुल प्रीमियर लीग'चा थरार अधिकृतपणे सुरू झाला. खेळाडूंनी दाखवलेल्या जोशपूर्ण खेळामुळे मैदानावर खऱ्या अर्थाने 'क्रिकेट उत्सव' साजरा झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. उद्घाटक नितीनजी क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, खेळ हा केवळ स्पर्धा नसून तो जीवनशैली घडवतो. संघभावना, शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण हे क्रिकेटमधून सहज विकसित होतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी खेळ आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रांत आघाडी घ्यावी.अध्यक्षीय भाषणात डॉ. दत्ता नलावडे यांनी गुरुकुल परिषदेच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत सांगितले, ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये दडलेली गुणवत्ता समोर आणण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे. गुरुकुल परिषदेच्या माध्यमातून भविष्यात अधिक व्यापक व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जातील.संपूर्ण कार्यक्रम उत्साही, शिस्तबद्ध व खेळाडूवृत्तीच्या वातावरणात पार पडला.सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रभावीपणे पार पडत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.'गुरुकुल प्रीमियर लीग'च्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवे बळ मिळाले असून, हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

सावित्रीबाई फुले राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद युवा दिना निमित्त पिशोर येथे भव्य रक्तदान शिबिर

दैनिक वादळ वार्ता
पिशोर। प्रतिनिधी

पिशोर येथे शनिवार दि. ०३ जानेवारी रोजी ग्रामीण रुग्णालय, पिशोर येथे सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ जयंती तसेच स्वामी विवेकानंद राष्ट्रीय युवा दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास पिशोर व परिसरातील युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ६३ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

हे रक्तदान शिबिर 'पारावरचे पोरं व तरुण मित्र मंडळ' आणि 'डॉक्टर्स असोसिएशन पिशोर' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. रक्तदान हेच श्रेष्ठ दान या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. विशेषतः तरुण वर्गाने मोठ्या प्रमाणात सहभाग घेत रक्तदान केले.

छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम या शिबिरासाठी विशेष उपस्थित होती. रक्तदानानंतर संकलित रक्त हे शासकीय रक्तपेढी, घाटी रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आले.

या शिबिरात एम.डी. मेडिसिन डॉ. संतोष बटुळे, डॉ. अमोल घोडके, डॉ. रौदळ मॅडम, सिस्टर सुरासे, सिस्टर पचलोरे, सिस्टर अधिकार, ब्रदर ठाकरे, राठोड यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते राजू मोकासे, केतन काजे, सुदाम मोकासे, उमेश मोकासे, जावेद शेख, गोकुळ डहाके, बबलू मोकासे, बापू खळखळ, अक्रम पठाण, कांबळे मामा, अमोल मोकासे, भानदास सुरडकर, विजय मोकासे, फरजाना शेख, समाधान गायकवाड, सूर्यकांत मोकासे, बंडू अण्णा, रामेश्वर मोकासे, अतुल हरणकाळ, सागर दवंगे, संतोष दवंगे, बबलू हरणकाळ आदींसह पिशोर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमामुळे समाजात रक्तदानाबाबत सकारात्मक संदेश पोहोचला असून आयोजकांच्या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

बुवासाहेब पाटील विद्यालयात क्रांतोज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

बुवासाहेब पाटील माध्य. व उच्च माध्य.विद्यालय, शिंदी येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या विशेष प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य सदाशिव मुंडे होते . त्यांनी सावित्रीबाईंच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. प्रा . शब्बीर शेख , प्रा . सुशिल राऊत ,प्रा . रामेश्वर चटप ,

प्रा . बाबासाहेब काळे यांनी सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान, सामाजिक क्रांतीतील महत्त्व आणि महात्मा फुले यांच्या तीन पत्रातील मजकूर आणि आजच्या संदर्भातील उपयुक्तता सांगितली तसेच प्रकाश जोगदंड ,विनायक घोळवे, हरि कांबळे स्त्री सक्षमीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांवर सखोल व्याख्यान दिले. त्यांनी सावित्रीबाईंच्या विचारांची आजच्या काळातील महत्त्वपूर्ण आवश्यकता स्पष्ट केली.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाईंच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून झाली. प्रमुख पाहुणे जाधव सर यांनी कार्यक्रमाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इयत्ता नववी ची विद्यार्थीनी कु श्रेया यादव हिने केले. तसेच सुत्र संचालन कु .वैष्णवी जाधव हिने केले तर आभार प्रदर्शन सिताराम चौरे यांनी केले. याप्रसंगी , मंचावर सावित्री वेषभूषा केलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

खोमणवाडी येथे भरदुपारी घर फोडी करून ५ लाख १२ हजार रु किमतीचे साडेसहा ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास

केज तालुक्यातील खोमणवाडी येथे भरदुपारी चोरी

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे । केज

केज तालुक्यातील नांदुरघाट जवळ असलेल्या खोमणवाडी येथे भरदुपारी शेतातील घर फोडून घरात ठेवलेले ५ लाख १२ हजार रु. किमतीचे साडेसहा तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले आहेत.या बाबतची माहिती अशी की, बीड तालुक्यातील पालसिंगण येथील रहिवाशी अमोल भिमराव जगताप यांचे केज तालुक्यातील नांदुरघाट जवळ असलेल्या खोमणवाडी शिवारातील शेत असून शेतात त्यांचे घर आहे.दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४:०० वा. चे सुमारास नांदुरघाट येथून जवळच असलेल्या खोमणवाडी शिवारातील त्यांच्या शेतातील घरी कोणी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी घराची कडी उघडुन घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटात ठेवलेले ५ लाख १२ हजार रु. किमतीचे ६ तोळे ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरुन नेले.

या प्रकरणी अमोल जगताप यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु र नं ८/२०२६ भा न्या सं. ३३१ (३), ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर हे तपास करीत आहेत.

_श्वान पथकाला पाचारण :- चोरीचा तपास करण्यासाठी पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण करून चोरांचा माग काढण्याचा देखील प्रयत्न केला असून पोलिस या चोरीचा कसून तपास करीत आहेत.

सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करणारा विरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे । केज

सोशल मीडियाच्या इंस्टाग्राम अकाउंटवर आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रोहन गलांडे याने भीमा कोरेगाव येथील येथील १ जानेवारी रोजी संपन्न होत असलेल्या शौर्य दिनाच्या निमित्ताने त्याच्या मोबाईलच्या इंस्टाग्राम या सोशल मीडियाच्या अकाउंटच्या स्टेटसला जाणीवपूर्वक भीमा कोरेगाव येथील शौर्य दिनाच्या निमित्ताने एका समाजाच्या भावना भडकाविण्याच्या वाईट उद्देशाने आणि दोन समाजात व दोन जातीत तेढ निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडून कायदा सुव्यवस्था बिघडविण्याच्या उद्देशाने एक आक्षेपार्ह मजकूर व्हायरल केला होता. त्यामुळे केज येथील दलीत चळवळीतील विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष योगेशभाई गायकवाड, लखन हजारे, निलेश साखरे, बाळासाहेब ओव्हाळ, अशोक गायकवाड, तात्या गवळी, प्रदीप गायकवाड, गौतम बचुटे, समाधान बचुटे, बाबुराव गालफाडे, लिंबराज गायकवाड, समाधान बचुटे आणि दलीत चळवळीतील कार्यकर्त्यानी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांची भेट घेतली आणि दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली.

> सोशल मीडियावर आक्षेपार्ह किंवा सामाजिक सलोखा बिघडविण्याच्या उद्देशाने पोस्ट व्हायरल केल्यास कठोर कारवाई कारवाई केली जाईल.
> –स्वप्नील उनवणे, पोलिस निरीक्षक, केज

दरम्यान स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष योगेशभाई गायकवाड यांच्या फिर्यादी वरून रोहन गलांडे यांच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ०७/२०२६ भा. न्या. सं. १८६(१), २९९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल मुरकुटे हे तपास करीत आहेत.

साळेगाव येथे ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी संपन्न

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे । केज

ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी केज तालुक्यातील साळेगाव येथे साजरी करण्यात आली जमिनी विका पण मुलांना शिकवा असा पुरोगामी आणि क्रांतिकारक विचारांचे ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी साळेगाव तालुका केज येथे साजरी करण्यात आली. पुण्यतिथी निमित्त भगवान श्रीकृष्ण आश्रम मठाचे ह.भ.प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांचे किर्तन आयोजित केले होते. कीर्तनाच्या कार्यक्रमाची सांगता झाल्या नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी गावातील भाविक भक्तासह नागरिकांनी लाभ घेतला. पुण्यतिथीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वामन गिते, पांडुरंग गिते, बालाजी गिते, अक्षय गिते, श्रीअनंत गिते, सुशेन गिते, दत्ता गिते, भागवत तिडके, आश्रुबा गिते यांनी परिश्रम घेतले.

मिंथूर ते नागभीड शेतकरी जनआक्रोश मोर्चात

वेगवेगळ्या जात पंथ धर्म व पक्षातील शेतकरी व दिव्यांग बांधव झाले सामील

दैनिक वादळ वार्ता
तळोधी (बा) । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित व ज्वलंत मागण्यांसाठी चलो मिंथूर ते नागभीड या पायदळ शेतकरी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले . हा मोर्चा शेतकरी जनआक्रोश मोर्चा समन्वय समितीच्या वतीने आज शनिवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १वाजता मिंथूर येथून निघाला व नागभीड शहरातून जाऊन तहसीलदार यांचेकडे निवेदन देण्यात आले.

या जनआक्रोश मोर्चाचे नेतृत्व शेतकरी नेते बच्चू कडू (माजी मंत्री) यांनी केले असून शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात सरकारला जागे करण्यासाठी हा लढा काढण्यात आला. फडणवीस साहेब, सावकारशाही थांबवा शेतकरी वाचवा असा ठाम इशारा या मोर्चातून देण्यात आला.

मोर्चाच्या माध्यमातून अन्यायग्रस्त शेतकरी रोशन कुळे यांच्यावर झालेल्या आर्थिक, शारीरिक व मानसिक छळास जबाबदार असलेल्या सावकारांवर तसेच मानवी अवयव तस्करीत सहभागी सर्वांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच रोशन कुळे यांना शासकीय नोकरी देण्यात यावी, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, शेतकऱ्यांना पेन्शन योजना लागू करावी, हमीभाव व स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी अंमलात आणाव्यात, तसेच गोसेखुर्द धरणाचे पाणी उन्हाळी धान पिकासाठी तातडीने उपलब्ध करून द्यावे, धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्यात यावा व धान उत्पादक शेतकऱ्यांना २४ तास विद्युत पुरवठा देण्यात यावा या प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत. या सर्व मागण्यांसाठी शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार, दिव्यांग व बेरोजगार, वेगवेगळ्या जात,धर्म,पंथव पक्षाचे लोक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.यात भंडारा चंद्रपूर गडचिरोली येथील शेतकरी सहभागी झाले होते.

तुम्ही नरेंद्र मोदी अन् देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षावर आरोप करत आहात हे लक्षात ठेवा!

भाजप प्रदेशाध्यक्षांचा अजित पवारांना थेट इशारा

दैनिक वादळ वार्ता
पुणे । प्रतिनिधी

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपवर भ्रष्टाचाराचे केलेले आरोप भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या चांगलेच जिव्हारी लागलेत. त्यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना थेट अजित पवारांनाच निर्वाणीचा इशारा दिला. अजित पवार पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाविषयी बोलत आहेत हे त्यांनी लक्षात घ्यावे, असे ते म्हणालेत. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या प्रकरणी अजित पवारांना मनभेद किंवा मतभेद निर्माण होतील असे विधान टाळण्याचा सल्ला दिला आहे.पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस असा सामना रंगला आहे. अजित पवारांनी शुक्रवारी या प्रकरणी पत्रकारांशी संवाद साधताना भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. भाजपने मागच्या ७ वर्षांत महापालिका अक्षरशः लुटून खाल्ली. या लुटारुंना रोखण्यासाठी आम्ही एकत्र आलोत, असे ते म्हणाले होते. एवढेच नाही तर ज्या लोकांनी माझ्यावर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्या सर्वांसोबत मी आज सरकारमध्ये बसलो असल्याचेही त्यांनी यावेळी पत्रकारांचे लक्ष वेधले होते. त्यांच्या या विधानाचा आज भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी समाचार घेतला.रवींद्र चव्हाण म्हणाले, अजित पवारांनी सर्वप्रथम स्वतःच्या पक्षाकडे पाहिले पाहिजे. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाविषयी बोलत आहेत हे त्यांनी लक्षात ठेवावे. प्रत्यक्षात आरोप - प्रत्यारोप कसे करावेत हे त्यांनी ठरवले पाहिजे. आम्ही कधी आरोप करायला गेलो तर त्यांना फार अडचणी निर्माण होतील. त्यामुळे त्यांनी त्याची काळजी घेतली पाहिजे. अजित पवारांना राजकारणाचा दीर्घ अनुभव असल्याने त्यांनी केवळ आरोप न करता संबंधित यंत्रणांकडे रीतसर तक्रार करावी पुण्याची निवडणूक ही पुणेकरांच्या नागरी समस्या सोडवण्याच्या मुद्यावर होत आहे. पुणेकरांना चांगल्या सुविधा कोण देऊ शकते यावर ही निवडणूक होत आहे. त्यांना या सुविधा भाजपच देऊ शकते.रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्यातील महायुती सरकार हे गतिमान सरकार नेमके कसे असावे याचे उत्कृष्ट उदाहरण घालून देत आहे. पुणेकरांना याची प्रचिती येत आहे. कारण, पुण्यातही हे सरकार गतिमान पद्धतीने काम करत आहे. पायाभूत प्रकल्पांची कामे वेगाने केली जात आहेत. त्यासाठी कोट्यवधी रुपये दिले जात आहेत. पुणे महापालिकेच्या स्थापनेपासूनचे स्वप्न साकार करायचे असेल तर त्या दिशेने पाऊले उचलणे आवश्यक आहे. पुणे महापालिकेत मेट्रोचा ठराव झाला होता.पण राज्यात सत्ता असतानाही महाविकास आघाडीला पुण्यात मेट्रो सुरू करता आली नाही. त्यांना ती करायचीच नव्हती. त्यांनी काहीच केले नाही. याऊलट केंद्रात मोदींचे सरकार आल्यानंतर पुण्यात मेट्रो सुरू झाली. सध्या शहरात ३३ किलोमीटरचे मेट्रोचे जाळे तयार झाले आहे, असे रवींद्र चव्हाण म्हणाले.



आंगनवाडीसेविका,आशा वर्कर्स व मध्यान भोजन बनवणारांच्या हक्कां साठी भारतीय जनता मजदुर संघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

देशातील आंगनवाडी सेविकांना श्रमिक म्हणून वैधानिक मान्यता,किमान वेतन,सामाजिक सुरक्षा व पेन्शन यांसारखे मूलभूत हक्क मिळावेत,यामागणी साठी दि.३१ डिसेंबर २०२५ पासून भारतीय जनता मजदूर संघ यांच्या वतीने राष्ट्रव्यापी पत्र व निवेदन आंदोलन आयोजित आले.यावेळी बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.हा उपक्रम औपचारिक किंवा प्रतीकात्मक नसून,संविधानिक अधिकार आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अंमल बजावणी साठीचा गंभीर लोकशाही प्रयत्न असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.देशभरातील सुमारे २७ लाख आंगनवाडी सेविका गेल्या अनेक दशकांपासून माता बालक पोषण,सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक कल्याणाची जबाबदारी सातत्याने पार पाडत आहेत.मात्रआजही त्यांना श्रमिक दर्जा,किमान वेतन तसेच सामाजिक सुरक्षे पासून वंचित ठेवण्यात येत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.सर्वोच्च न्यायालयाने दीर्घकाळ नियमित व नियंत्रित स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना केवळ मानधनधारक स्वयंसेवक न मानता श्रमिक म्हणून मान्यता देण्याबाबत स्पष्ट भूमिका घेतली असताना ही प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. संघटनेने या प्रश्नांच्या निराकरणाची अपेक्षा सध्याच्या सरकारकडूनच असून,संघर्षाची भूमिका न घेता संविधानिक व संवाद आधारित मार्गाने हे ज्ञापनपत्र आंदोलन राबविण्यात

येत आहे.या आंदोलनाअंतर्गत महिला व बाल विकास मंत्रालय, श्रम व रोजगार मंत्रालय, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय तसेच माननीय पंतप्रधान यांना निवेदन सादर करण्यात आले. दबाव निर्माण करणे हा उद्देश नसून,धोरण,कायदा आणि प्रत्यक्ष परिस्थिती तील तफावत अधोरेखित करून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार श्रम- सन्मान सुनिश्चित करण्या साठी सकारात्मक पावले उचलली जावीत,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.दरम्यान, देशातील बौद्धिक वर्ग, शिक्षणतज्ज्ञ,धोरण विशेष तज्ञ आणि विचारवंत नागरिकांनी याविषयाकडे भावनिक नव्हे तर कायदेशीर,संविधानिक व नीतिगत दृष्टिकोनातून पाहून न्याय्य तोडगा काढण्यासाठी पुढाकार घ्यावा,असे आवाहनही संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके,प्रमोद पुसरेकर, विक्रम गायकवाड, किशोर कुलकर्णी आदी उपस्थित होते.

केज येथे सदगुरु धुंडा महाराज व सौ.कृष्णामाई यांच्या पुण्यतिथी निमित्त

भव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तन महोत्सवाला प्रारंभ

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

वै.सद्गुरु श्री धुंडामहाराज देगलुरकर व मातोश्री सौ. कृष्णाबाई यांच्या पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने केज शहरात भव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन राम मंदिर,पाटील गल्ली केज येथे करण्यात आले आहे.हा धार्मिक व आध्यात्मिक उत्सव दि.४ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान श्रीराम मंदिर, पाटील गल्ली,केज जि. बीड येथे संपन्न होणार आहे.या सोहळ्यासाठी आशीर्वाद श्रीगुरु चैतन्य महाराज देगलुरकर यांचे लाभलेले असून,दररोज सकाळी ८-०० वाजता ग्रंथदिंडी काढण्यात आली ज्ञानेश्वरीपारायण सकाळी ९-३० ते १२-३० यावेळेत हरिपाठ,दुपारी ४-०० वाजता व हरिकीर्तन सायंकाळी ५-०० ते ७-००कीर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत.या महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार सहभागी होणार असून,

दि.४ जानेवारी ह.भ.प. शिवाजी महाराज मुळे आडस,दि.५ जानेवारी रोजी ह.भ.प.अंबादास महाराज चिक्षे अंबाजोगाई,दि.६ जानेवारी रोजी ह.भ.प. श्री शिवराम महाराज मुळे साबला,दि.७ जानेवारी रोजी ह.भ.प.गणेशानंद महाराज जोगदंड शास्त्री, साळेगाव,दि.८ जानेवारी रोजी ह.भ.प.दीपक महाराज मेटे लहूरीकर,दि. ९ जानेवारी रोजी ह.भ.प. प्रमोद महाराज पवार चंदनसावरगाव,दि.१० जानेवारी रोजी ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री,तर दि.११ जानेवारी रोजी ह.भ.प. भालचंद्र महाराज देव केजकर यांचे काल्याचे कीर्तन व नंतर महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.७ जानेवारी रोजी वै. सद्गुरु श्री धुंडा महाराज देगलुरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त दीपोत्सव व कीर्तनानंतर होणार आहे.या संपूर्ण कार्यक्रमासाठी केज व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजक समस्त भक्तगण,केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

येडेश्वरी फाऊंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी व्यवसाय उभारणीस बळ

लव्हुरीत राजवीर एंटरप्राईजेस चे उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली येडेश्वरी फाउंडेशन,केज यांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम प्रभावी ठरत असून,शेकडोमहिला आज स्वतःचा व्यवसाय उभा करत आहेत. आर्थिक,सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण व्हावे,त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्यात,या उद्दिष्टाने येडेश्वरी फाउंडेशन तर्फे महिला सक्षमीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या येडेश्वरी फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांना शिवणकाम, अरीवर्क कला,बेकरी प्रॉडक्ट्स,कॉम्प्युटर कोर्स आदी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. येडेश्वरी कार्यालयात सुरू असलेल्या या प्रशिक्षणा तून महिलांनी बचत गटांच्या



माध्यमातून स्वतःचे व्यवसाय सुरू केले असून,अनेक कुटुंबांना याचा थेट लाभ होत आहे.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.३ जानेवारी रोजी येडेश्वरी फाउंडेशनच्या सौजन्याने लव्हुरी येथे रूपालीताई शिनगारे यांच्या राजवीर एंटरप्राईजेस व जनरल स्टोअर्स या व्यवसायाचे उद्घाटन येडेश्वरी फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ.शितलताई लांडगे यांच्या हस्ते संपन्न झाले.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सतीश पाटेकर यांनी केले तर प्रास्ताविक सरस्वती शिनगारे यांनी मांडली.प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच विजय दादा चाळक,भाई दादा चाळक,छत्रभुज चाळक, दीपिका पाटेकर यांच्या सह गावातील मान्यवर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.येडेश्वरी फाउंडेशनच्या सहकार्याने गोरगरीब महिलांचे व्यवसाय उभे राहत असून,या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महिलांच्या स्वावलंबना साठी राबविण्यात येणारे हे प्रयत्न प्रेरणादायी ठरत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

नंदुरबार पोलिसांची मोठी कारवाई: ६.७० लाखांचा प्रतिबंधित नायलॉन मांजा जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रतिबंधित नायलॉन मांजाची चोरटी विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध नंदुरबार शहर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी बाहेरपुरा भागात सापळा रचून एका टेम्पोसह ६ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून, या प्रकरणी दोन जणांना ताब्यात घेतले आहे.

दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी हेमंतकुमार पाटील यांना माहिती मिळाली की, बाहेरपुरा भागात एका चारचाकी टेम्पोमध्ये प्रतिबंधित नायलॉन मांजाचे साठे लपवून ठेवलेले

नायलॉन मांजा मानवी जीवनासाठी आणि पक्ष्यांसाठी अत्यंत घातक आहे. शासनाने यावर पूर्णतः बंदी घातली आहे. नागरिकांनी पतंगोत्सवात नायलॉन मांजाचा वापर टाळावा. कोणीही अशा मांजाची विक्री किंवा साठवणूक करताना आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. दोषींवर कडक कारवाई केली जाईल.
– श्रवण दत्त. एस (पोलीस अधीक्षक, नंदुरबार)

आहेत. पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली लागलीच डी.बी. पथकाने या भागात शोधमोहीम राबवली.

तपास सुरू असताना 'गौतम ट्रेडर्स' परिसरात एक टाटा एस मालवाहू टेम्पो (क्र.एम एच ४७ ई १२५२) संशयास्पदरीत्या उभा असल्याचे आढळले. पोलिसांनी झडती घेतली असता, त्यात नायलॉन मांजाचे ६० मोठे रील सापडले.

पोलिसांनी टेम्पो चालक अर्जुन अहिरे (वय ४७, रा. नंदुरबार) याला ताब्यात घेऊन विचारपूस केली. त्याने सांगितले की, हा माल शहादा येथील काशिनाथ मार्केटमधून एका अज्ञात व्यक्तीने नंदुरबारला पोहोचवण्यासाठी दिला होता. अधिक तांत्रिक तपास केला असता, हा माल नंदुरबारमधील कल्पेश उमेश जावरे (वय २५, रा. जुनी भोई गल्ली) याने विक्रीसाठी मागवल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी कल्पेशलाही ताब्यात घेतले आहे.

सेंद्रिय शेतीचा आदर्श नमुना! तळवे येथील 'जय बलराम शेतकरी गट'ला 'ग्रोवर्ल्ड आदर्श शेतकरी गट २०२६'चा मानाचा सन्मान

दैनिक वादळ वार्ता
तळोदा । दिपक गोसावी

तळवे (ता. तळोदा) येथील 'जय बलराम शेतकरी गटाने' सेंद्रिय शेतीचा यशस्वी पॅटर्न उभा करून संपूर्ण जिल्ह्यासमोर आदर्श निर्माण केला आहे. सेंद्रिय शेतीतील नाविन्यपूर्ण प्रयोग, जमिनीचा पोत सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न तसेच इतर शेतकऱ्यांना प्रशिक्षण देऊन संघटित करण्याच्या कार्याची दखल घेत या गटाला 'ग्रोवर्ल्ड आदर्श शेतकरी गट २०२६' हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.शहादा येथे भरलेल्या 'ग्रोवर्ल्ड कृषी प्रदर्शन २०२६' मध्ये नंदुरबारचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या हस्ते या पुरस्काराचा गौरव करण्यात आला. यावेळी ग्रोवर्ल्डचे संचालक शैलेंद्र चव्हाण तसेच कृषी क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला गटाचे पदाधिकारी छोटू कलाल, विजयराव सोनवणे, गोटू कलाल, चंद्रकांत सोनवणे, उमेश सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. सन्मानचिन्ह, मानपत्र आणि मेडल देऊन गटाचा सत्कार करण्यात आला. या यशामुळे तळवे गावाचे नाव जिल्ह्याच्या कृषी नकाशावर ठळकपणे झळकले असून शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांकडून 'जय बलराम शेतकरी गटाचे' सर्वत्र अभिनंदन होत आहे.

विकसित भारत २०४७ सहकार्यानेच साकार-डॉ. सर्जेराव निमसे; बनसारोळा येथे बहुविद्याशाखीय परिषदेस प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात विकसित भारत २०४७ : स्वातंत्र्याच्या १०० वर्षाकडे भारताची वाटचाल या विषयावर एकदिवसीय बहुविद्याशाखीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी बोलताना माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी विकसित भारत २०४७ या व्हिजनची पूर्तता सर्वांच्या सहकार्यानेच शक्य असल्याचे सांगितले. आधुनिक पायाभूत सुविधा, बेरोजगारी, कृषी, शिक्षण, संशोधन-नवोपक्रम, सामाजिक प्रगती आणि हवामान बदल या महत्त्वाच्या आव्हानांवर मात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.या परिषदेत बीजभाषण करताना डॉ. जयप्रकाश दरगड यांनी सादरीकरणाद्वारे विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारताची सद्यस्थिती स्पष्ट करत आव्हाने आणि उपाययोजना यावर सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी NEP-2020 धोरण विकसित भारताच्या दिशेने महत्त्वाची भूमिका बजावेल असे प्रतिपादन केले.

परिषदेच्या पुढील सत्रांत प्रो. डॉ. महेश जोशी व प्रो. डॉ. राजेंद्र धाणे यांनी कृषी, ग्रामीण-शहरी विकास, तंत्रज्ञान, भाषा व शिक्षणव्यवस्थेतील परिवर्तनाची गरज अधोरेखित केली. परिषदेकरिता देशभरातून १७३ संशोधन निबंध प्राप्त झाले असून प्रोसिडिंगसह प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.परिषद यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, संयोजक प्रो. डॉ. नंदकिशोर चिताडे, डॉ. जयंत मोरे, प्रो. डॉ. मुरलीधर लहाडे तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक-कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पफुले पिंपळगाव येथे स्त्री शिक्षणाची जननी सावित्रामाई यांची जयंती प्रोफेसर-बागुल सर,यांच्या व्याख्यानाने उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
माजलगाव । प्रतिनिधी

देशाच्या सर्वोच्च पदावर राष्ट्रपती , पंतप्रधान, राज्यसभा व लोकसभा,अध्यक्ष, सर्वोच्च न्यायालय, पदावर आज आपण स्त्री पाहत आहोत ती सर्व पुण्याई स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा फुले, तसेच भारताची पहिली शिक्षिका सावित्रीमाई फुलेंच्या त्यागातून स्त्रियांना वैभव मिळालेले आहे. तसेच महात्मा फुले व सावित्रीबाई यांनी जर स्त्री शिक्षणाची सुरुवात केली नसती तर आज असते . पूर्व परिस्थिती आपण पाहिले आहे की स्त्रीला समाजाचे किचकट बंधनात बांधलेली होती. अशाप्रकारे अनेक विषयावर प्रोफेसर.-बाबुल सर , आपल्या व्याख्यानातून माहिती यांनी तसेच इतर विविध विषयावर देखील अभ्यास पूर्ण माहिती आपल्या व्याख्यानातून

सांगण्यात आली. असणारी व्याख्याते आज फुले पिंपळगाव येथील सावित्रीमाई जयंती निमित्त बागुल सर यांनी मार्गदर्शक केले त्याबद्दल धन्यवाद ❊जयंतीनिमित्त,.त्यावेळी कांशीराम साळवे सर, मुख्याध्यापक जिल्हा परिषद नाथापूर हायस्कूल, गेवराई., एस.बी. मोरे सर बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष, वाघमारे सर, बौद्ध महासभा सदस्य, व इतर. मान्यवर स्त्री शिक्षणाचे जनक सावित्रीबाई फुले यांच्या विविध विषयावर अनेक महत्वपूर्ण पैलू यांची अभ्यासपूर्ण माहिती सावित्रीमाई जयंतीनिमित्त देण्यात आली.माहितीयांनी देखील आपले अनमोल विचार या ठिकाणी व्यक्त केले केले. अनेक फुले पिंपळगाव ग्रामस्थ व इतर मान्यवर उपस्थित होते. तरी सर्व सावित्रामाई प्रेमी जयंतीनिमित्त उपस्थित मान्यवरांचे अभिनंदन तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष व संयोजक- श्रीराम कोरडे (फुले पिंपळगाव) सिद्धार्थ साळवे व इतर बौद्ध उपासक, उपाशीका, व समस्त फुले पिंपळगाव ग्रामस्थ

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077